# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा

### विद्याशाखा परिषद बैठक - इतिवृत्त

शुक्रवार दि. 10.05.2019 रोजी दुपारी 1.00 वाजता वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा परिषदेची सभा आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकिस खालील सदस्य उपस्थित होते.

1. मा. डॉ. पंडित पलांडे, संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा — अध्यक्ष
2. डॉ. महेश कुलकर्णी, नाशिक — सदस्य
3. डॉ. आर एन नायर, डोंबिवली — सदस्य
4. डॉ. लेसन आझादी, पाचगणी — निमंत्रीत
4. डॉ. सुरेंद्र पाटोळे, सहा. प्राध्यापक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा — सदस्य
5. डॉ. प्रमोद खंदारे, प्र संचालक, संगणक विद्याशाखा — सदस्य
6. डॉ. उमेश राजदेरकर, संचालक, मानव्य विद्या व सामाजिक शास्त्रेविद्याशाखा — सदस्य
5. डॉ. लतिका गायकवाड, सहा प्राध्यापक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा — सदस्य सचिव

सभेच्या सुरवातीला विद्याशाखेचे संचालक यांनी उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांचे स्वागत केले. डॉ. राजश्री शिंदे, पुणे, डॉ. व्ही.एम. चव्हाण, कोल्हापूर, डॉ. जयदिप निकम, डॉ. कविता साळुंके हे सदस्य काही अपरिहार्य कारणांमुळे सभेस उपस्थित राहू शकले नाहीत. सदर बैठकीत पुढील विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.

| विषय क्र | विषय पत्रिका व निर्णय |
|---|---|
| वाणिज्य/2019 3.1 | दि. 07 एप्रिल 2017 रोजी झालेल्या विद्याशाखा परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.<br>ठराव- मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले |
| वाणिज्य/2019 3.2 | विद्याशाखेत चालविण्यात येणा-या बी.कॉम शिक्षणक्रमाच्या पूर्नरचने संदर्भात आढावा बैठक दि. 25.08.2018 रोजी घेण्यात आली होती. बैठकिचे इतिवृत्त सोबत जोडले आहे. या शिक्षणक्रमाची पूर्नरचना याच पध्दतीने करावयाची किंवा कसे या संदर्भात विषय चर्चेसाठी सविनय सादर.<br>ठराव- बी.कॉम शिक्षणक्रमाच्या बैठकिचे इतिवत्त वाचून कायम करण्यात आले. या संदर्भात अतिषय संदिग्धता असल्यामुळे पुढील निर्णय घेण्यासाठी विद्याशाखा परिषद व बी.कॉम शिक्षणक्रम पुर्नरचने संदर्भात सर्व लेखक व संपादक यांची दोन दिवस स्वतंत्र बैठक आयोजीत करावी व चर्चा करुन अंतीम निर्णय घेण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. बैठक जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आयोजीत करावी असे ठरले. |
| वाणिज्य/2019 3.3 | एम.बी.ए शिक्षणक्रमाच्या प्रकल्प आराखडा व अहवाल नियमांना मान्यता देणे बाबत प्रस्ताव मंजूरीसाठी सादर<br>ठराव- एम बी ए शिक्षणक्रमाच्या प्रकल्प आराखडा व अहवाल नियमांना सर्वानुमते मान्यता देण्यात आलेली आहे. |
| वाणिज्य/2019 3.4 | BBA(Aviation/ Hosopitlity/Travel & Tourism) शिक्षणक्रमाच्या प्रकल्प आराखडा व अहवाल नियमांना मान्यता देणे बाबत तसेच कस्तुरी शिक्षणसंस्थेच्या बीबीए-एव्हीएशन प्रस्तावावर निर्णय घेणे- प्रस्ताव मंजूरीसाठी सादर.<br>ठराव- BBA(Aviation/ Hosopitlity/Travel & Tourism) शिक्षणक्रमाच्या प्रकल्प आराखडा व अहवाल नियमांना सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच कस्तुरी शिक्षणसंस्थेच्या बीबीए-एव्हीएशन हा शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र चालविण्याबाबत प्रस्तावावर चर्चा करण्यात आली. सदर शिक्षणक्रमाच्या अभ्यासाठी पुणे येथे विमानतळ असल्याने तसेच विद्यार्थांच्या सोईसाठी |

आवक क्र. VC/9426 10/05/2019

| | |
|---|---|
| | सदर अभ्यासकेंद्रास पुणे येथे संपर्क सत्र घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. विद्यापीठ कोणताही अर्थीक बोजा सोसणार नाही याअटीवर मंजूरी देण्यात आलेली आहे. |
| वाणिज्य/2019 3.5 | बाहाय ॲकेडमी, पाचगणी यांनी value education चा एक optional paper सुरु करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर केला होता. या संदर्भात चर्चा करण्यासाठी दि. 25.08.2018 रोजी संबंधीत व्यक्तींशी चर्चा झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी विद्याशाखा परिषदेत विषय सादर.<br>ठराव- बाहाय् ॲकेडमी, पाचगणी यांनी लिडर शिप फॉर चेंज चा एक ऑपशनल पेपर सुरु करण्यासंदर्भात चर्चा झाली. सदर ऑपशनल पेपर हा एम बी ए (पी 79)/एम कॉम(एम 17) या शिक्षणक्रमाच्या द्वितीय सत्रात generic Elective/Audit Course म्हणून शैक्षणिक वर्ष 2019-20 पासून सुरू करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| वाणिज्य/2019 3.6 | यशवंत मेमोरीयल ट्रस्ट, रायगड यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर चर्चा करुन निर्णय घेणे- सदर अभ्यासकेंद्रात वाणिज्य विद्याशाखेचे एम.बी.ए, एम.कॉम. व बी.कॉम शिक्षणक्रम चालविले जातात. या अभ्यासकेंद्राने Material Management/Supply Chain Management/Tax Laws/Import Export Management/Marketing Management इत्यादी विषयात पदविका चालू करण्याच्या संदर्भात विनंती पत्र पाठविलेले आहेत. सदर विषयावर चर्चा करण्यासाठी प्रस्ताव सादर<br>ठराव- यशवंत मेमोरीयल ट्रस्ट, रायगड यांच्या प्रस्तावावर चर्चा करण्यात आली. तुर्तास हे शिक्षणक्रम सुरू करणे शक्य नसल्यामुळे सदर प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात आला. |
| वाणिज्य/2019 3.7 | एम.बी.ए. शिक्षणक्रमाच्या MBA-101-Accounts या विषयांच्या मुल्यमापन पॅटर्न वर चर्चा करुन निर्णय घेणे बाबत प्रस्ताव सादर<br>ठराव- एम बी ए शिक्षणक्रमाच्या MBA-101-Accounts या विषयांच्या मुल्यमापन पॅटर्न चर्चा करण्यात आली. या विषयासंदर्भात सखोल चर्चा करण्यासाठी एम बी ए शिक्षणक्रमाच्या काही निवडक अभ्यासकेंद्रावरील संमंत्रकांची बैठक घेवून चर्चा करण्यात येईल व त्यानुसार निर्णय घेण्यात येईल.असे ठरले. |
| वाणिज्य/2019 3.8 | एम.बी.ए . शिक्षणक्रमाच्या प्रवेश पात्रतेसंदर्भात उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या नियमाप्रमाणे किमान पात्रता 50 टक्के असणे आवश्यक आहे. त्यानुसार सध्या विद्यापीठाच्या एम.बी.ए शिक्षणक्रमासाठी दिलेल्या 45 टक्के किमान पात्रतेवरून पदवी शिक्षणक्रमास किमान 50 टक्के समतुल्य (aggregate ) गुण असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन राजपत्र RNI No. MAHBIL/2009/3783 नुसार सन 2019 पासून अमलात आणण्यासंदर्भत विषय चर्चेसाठी सविनय सादर<br>ठराव- एम.बी.ए . शिक्षणक्रमाच्या प्रवेश पात्रतेसंदर्भात उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या नियमाप्रमाणे किमान पात्रता 50 टक्के असणे आवश्यक आहे. त्यानुसार सध्या विद्यापीठाच्या एम.बी.ए शिक्षणक्रमासाठी दिलेल्या 45 टक्के किमान पात्रतेवरून पदवी शिक्षणक्रमास किमान 50 टक्के समतुल्य (aggregate ) गुण असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन राजपत्र RNI No. MAHBIL/2009/3783 नुसार सन 2019 पासून अमलात आणण्यासंदर्भत सखोल चर्चा करण्यात आली.त्यानुसार शैक्षणिक वर्ष 2019-20 पासून पदवी शिक्षणक्रमास किमान पात्रता महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार 50 टक्के समतुल्ल गुण असणे आवश्यक आहे असे सर्वानुमते ठरले. |
| वाणिज्य/2019 3.9 | वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेत चालविण्यात येत असलेल्या BBA(Aviation/ Hosopitlity/Travel & Tourism) शिक्षणक्रमाच्या पहिल्या तुकडीच्या विद्यार्थांना प्रकल्प अहवाल जमा करण्यासंदर्भात मुदत वाढ मिळणेबाबत विषय सविनय् सादर-<br>ठराव- वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेत चालविण्यात येत असलेल्या BBA(Aviation/ Hosopitlity/Travel & Tourism) शिक्षणक्रमाच्या सन 2019-20 च्या अंतीम वर्षाच्या विद्यार्थांना प्रकल्प अहवाल जमा करण्यासंदर्भात मुदत वाढ मिळणेबाबत चर्चा करण्यात आली त्यानुसार विद्यार्थानी प्रकल्प अहवाल 30 मे 2019 पर्यंत विद्यापीठ मुख्यालयात जमा करण्यासाठी मुदत वाढ देण्यात आली.. |
| वाणिज्य/2019 3.10 | विद्याशाखेचे एम.बी.ए शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र महाराष्ट्र विद्यार्थी सहायक मंडळ. पुणे (62333) यांनी प्रकल्पा अहवालांचे गुणे पाठविलेले आहे. सदर अभ्यासकेंद्राने 200 पैकी |

| | |
|---|---|
| | 187-194 गुण सर्व विद्यार्थांना दिलेले आहेत. ... परिषदे पुढे पुढील चर्चेसाठी सविनय सदर- ठराव- एम.बी.ए शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र महाराष्ट्र विद्यार्थी सहायक मंडळ. पुणे (62333) यांनी प्रकल्पा अहवालांचे गुणे पाठविलेले आहे. सदर अभ्यासकेंद्राने 200 पैकी 187-194 गुण सर्व विद्यार्थांना दिलेले आहेत. ही बाब संदिग्ध वाटली. त्यामुळे सदर केंद्रावरील या सर्व विद्यार्थाचे प्रकल्प अहवाल विद्याशाखेत त्याचे मुल्यमापन करण्यात येईल व गुण परीक्षा विभागास पाठवावे असे सर्वानुमते ठरले. |
| वाणिज्य/2019 3.11 | B,Com/B,Com Co-op, BBA (A/H/T) BBA(IHTM) शिक्षणक्रमाच्या पुर्ननोंदणी संदर्भातील नियमास मान्यता देणेबाबत विषय चर्चेसाठी सविनय सादर ठराव- B,Com/B,Com Co-op, BBA (A/H/T) BBA(IHTM) शिक्षणक्रमाच्या पुर्ननोंदणी संदर्भातील नियमास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| वाणिज्य/2019 3.12 | B,Com/B,Com Co-op, BBA (A/H/T) BBA(IHTM) शिक्षणक्रमाच्या श्रेणी सुधारणा संदर्भात विषय चर्चेसाठी सविनय सादर- ठराव- B,Com/B,Com Co-op, BBA (A/H/T) BBA(IHTM) शिक्षणक्रमाच्या श्रेणी सुधारणा संदर्भात नियमास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| वाणिज्य/2019 3.13 | एम.बी.ए (PPM) शिक्षणक्रमाच्या पुर्ननोंदणी व श्रेणी सुधारणा संदर्भात विद्याशाखेतील एम बी ए ( पी 79) शिक्षणक्रमाचे नियम लागु करणे बाबत  विषय चर्चेसाठी सविनय सादर- ठराव- एम.बी.ए (PPM) शिक्षणक्रमाच्या पुर्ननोंदणी व श्रेणी सुधारणा संदर्भात विद्याशाखेतील एम बी ए ( पी 79) शिक्षणक्रमाचे नियम लागु करणे बाबत  सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| वाणिज्य/2019 3.14 | एम,बी,ए व एम कॉम शिक्षणक्रमात GST संदर्भात syllabus समाविष्ट करणे बाबत.विषय चर्चेसाठी सविनय सादर ठराव- एम,बी,ए व एम कॉम शिक्षणक्रमात GST संदर्भात syllabus समाविष्ट करणे, तुर्तास शक्य नसल्याने विषय अमान्य करण्यात आला. |
| वाणिज्य/2019 3.15 | एन आय ई एम, मुंबई यांनी सादर केलेला event Management विषयात प्रमाणपत्र/ पदवीका/ पदवी सुरू करणेबाबत आलेल्या प्रस्तावावर चर्चा करणेबाबत विषय सविनय सादर ठराव-.एन आय ई एम, मुंबई यांनी सादर केलेला event Management विषयात प्रमाणपत्र/ पदवीका/ पदवी सुरू करणेबाबत निर्णय घेण्यासाठी सदर संस्थेस भेट देवून तसेच या शिक्षणक्रमासंदर्भात सर्व सत्य परिस्थिती जाणून घेण्यासाठी विद्याशाखा संचालक व विद्याशाखेतील दोन सहा प्राध्यापक यांची त्रीसदस्यीय समीती स्थापन करण्यात आली. ही समीती या संस्थेस भेट देवून आपला अहवाल पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करेल, असे सर्वानुमते ठरले. |
| वाणिज्य/2009 3.16 | एम.बी. ए शिक्षणक्रमाची एक विद्यार्थी कु. मीताली मिलींद ठाकरे यांना त्यांच्या अभ्यासकेंद्र भोसला मिलीटरी महाविद्यालय येथे मिळणा-या असहकार्याबद्दल सादर केलेल्या पत्रावर चर्चा करण्याबाबत विषय सविनय सादर ठराव- एम.बी. ए शिक्षणक्रमाची एक विद्यार्थी कु. मीताली मिलींद ठाकरे यांना त्यांच्या अभ्यासकेंद्र भोसला मिलीटरी महाविद्यालय येथे मिळणा-या असहकार्याबद्दल सादर केलेल्या पत्रावर चर्चा करण्यात आली. सदर विद्यार्थीनीस त्यांचा प्रकल्प अहवाल त्यांच्या अभ्यासकेंद्रावर म्हणजेच भोसला मिलीटरी महाविद्यालयातच सादर करावा लागेल,. परंतू या अभ्यासकेंद्राचे एम बी ए शिक्षणक्रमाचे संयोजक यांना मुख्यालयात बोलवून या संदर्भात अधिक मार्गदर्शन करुन त्यांनी पुढील कार्यवाही तातडीने करावी असे सर्वानुमते ठरले. |

सभेच्या शेवटी मा, अध्यक्षांनी सर्वांचे आभार मानले व सभा संपली असे जाहीर केले.

मा. कुलगुरू यांच्या मान्यतेस्तव —

< Vayunandan

मा. कुलगुरु

संचालक/ अध्यक्ष
विद्याशाखा परिषद
वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा